**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. प्रकाश दादोबा चौगले
७९०/३३,ब जगताप नगर, (पुर्व)
पाचगांव रोड, (गणपती देवालय नजिक)
कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

१) **जन माहिती अधिकारी,**
कोल्हापूर महानगरपालिका, (बांधकाम व आरोग्य विभाग),
कोल्हापूर

२) **जन माहिती अधिकारी ,**
पोलिस निरीक्षक, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९०/२०१०/कोल्हापूर |
| २ | **मूळ माहिती मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही.** | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. प्रकाश दादोबा चौगले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य शुल्क (रु.२०/- मुंद्राक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.आनंदराव बाबूराव लादे
१०१, बुधवार पेठ, कराड,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक (वतन संकलन),**
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९३/२०१०/पुणे |
| २ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** कराड येथील महार इनाम वर्ग ६ब ची जमिन सर्व्हे नं. २/२६-१ फायनल प्लॉट नं.१४७ या जमिनीच्या प्रकरणासंदर्भातील कागदपत्रे | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. आनंदराव बाबूराव लादे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ व जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.भास्कर आबाजी वायाळ
अणूविज विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा,
पुणे-१

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
अणूविज विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
अणूविज विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९५/२०१०/पुणे |
| २ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** कालबध्द: पदोन्नती संदर्भातील खुलासा | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. भास्कर आबाजी वायाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नितीन गजानन जाधव
मु.पो.जाधववाडी, ता.खानापूर,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
खानापूर -विटा, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
खानापूर- विटा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०६/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०४/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४/०७/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे जाधववाडी येथील सर्व खातेदारांची सन १९३० ते मार्च २००८ अखेर पर्यंतची वर्षनिहाय व विहित नमुन्यात माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. नितीन गजानन जाधव हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही अष्ठ्यात्तर वर्षांच्या कालावधीतील असून विस्तृत स्वरुपाची आहे सदर माहितीसाठीचे शुल्क भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते तथापि अपीलकर्ता श्री. जाधव यांनी शुल्क

भरलेले नसल्याने त्यांना माहिती देण्यात आलेली नाही, असे प्रपत्रावरुन व उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. अपीलकर्त्याने आवश्यक तर शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुरेश हरी सूर्यवंशी
मु.पो.निरवांगी, ता.इंदापूर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
अभिलेख कक्ष, तहसीलदार कार्यालय,
इंदापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१३/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/९/२००९, १८/११/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे निरवांगी येथील सन १९८१-८२ साली उभारलेल्या घरकुलांबाबतच्या रजिस्टरची नकल, बांधकाम आदेशाची प्रत, बांधकामाच्या पंचनाम्याची नकल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश हरी सूर्यवंशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांनी एकापेक्षा अधिक माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले असल्याचे दिसून येते. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधियिम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

१) श्री. ज्ञानेश्वर नामदेव धोत्रे
२) श्री. जिवराज लक्ष्मण धोत्रे
घर नं.६४, बुधवार पेठ,
वडारगल्ली, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, पहिला मजला सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
वडार समाज संस्था,
बुधवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२७/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/११/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७/११/२०१० |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/२/२०१० |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वडार समाज संस्थेच्या अध्यक्ष, पदाधिकारी, संचालक, कार्यकारीणी सदस्य यांची निवड; संस्थेस प्राप्त होणारे अनुदान, संस्थेच्या मालकीच्या खोल्या, संस्थेची पावती पुस्तके, बँक पासबुक, शिपाई पदी नियुक्ती, मागील दोन वर्षांच्या सर्वसाधारण सभेची इतिवृत्ते, ताळेबंद व लेखापरिक्षण अहवाल इ. ५ मुद्दे | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर नामदेव धोत्रे व श्री. जिवराज लक्ष्मण धोत्रे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मूळ अर्जदार श्री. ज्ञानेश्वर नामदेव धोत्रे व श्री. जिवराज लक्ष्मण धोत्रे यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि.१५/२/२०१० रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जयराज कोरण वेल्लायन
रा.प्लॉट नं.२३, वैभव को-ऑप.हौसिंग सोसायटी,
शाहू नाक्याजवळ,
कोल्हापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक,**
पोलीस अधिक्षक कार्यालय,
कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक,
सोन्या मारुती चौक,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३२/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०१/२०१० |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं.११६२ ई वॉर्ड, मालती बंगला, साईक्स एक्स्टेशन, कोल्हापूर या मिळकतीतील कब्ज्याच्या वादासंदर्भात शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद का घेतली गेली नाही याबाबत तसेच तपासासंदर्भातील कागदपत्रांच्या समावेशाबाबतचा खुलासा | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जयराज कोरण वेल्लायन यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आबासाहेब गोपाळराव पाटील
मु.पो.खामगांव, ता.बार्शी,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,
जि.सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३४/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०६/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०८/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/१२/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बार्शी - सोलापूर रा.मा.क्र.१५१ या रस्त्यावरील साखळी क्र.कि.मी.४०/०० ते ४२/०० मधील पिचिंगच्या कामाबद्दल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. आबासाहेब गोपाळराव पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपिल हे माहितीचा अधिकर अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केलेले नाही. सबब सदर अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठोबा हरी किरवे (तेली)
रा.गुळूंब, ता.वाई,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३५/२०१०/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. विठोबा हरी किरवे (तेली) यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नाही. तसेच अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राजेंद्र मोहनराव चव्हाण
मु.पो. कुंभारगांव, ता.पाटण,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सांगली पाटबंधारे विभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३६/२०१०/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>चाळकेवाडी, लघु पाटबंधारे तलावाच्या संदर्भातील एकूण ७ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजेंद्र मोहनराव चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गणपतराव बळवंत थोरात
रा.मलकापूर, ता.कराड,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती** अधिकारी तथा सहायक निबंधक (३),
सहकारी संस्था, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३८/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/१०/२०१० |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सामान्य कर्ज खाते नं. ४०९ च्या परत फेडीसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.गणपतराव बळवंत थोरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे तसेच आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नाही. तसेच अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.

दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शिवनिंग लक्ष्मण सिदरेड्डी
मु.कोळगेरी, पो.सनमडी, ता.जत,
जिल्हा सांगली

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती जत, ता.जत,
जिल्हा सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत जत, ता.जत,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५६/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/१०/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/१२/२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/०१/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जत ग्रामपंचायतीच्या वॉर्ड क्र.५ मधील नवीन व्यापार संकुलातील दुकान गाळयाच्या दि २४/३/२००६ रोजी झालेल्या लिलावाच्या अटी, शर्ती व नियमांची प्रत | |

**विवेचन**

दि.१६/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. शिवनिंग लक्ष्मण सिदरेड्डी हे अनुपस्थित होते. 'आपल्या मूळ माहिती - मागणी नुसार मागणी केलेली माहिती मिळाली असल्याची' अपीलकर्त्यांची दि.१२/११/२००७ ची पोहोच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत जत श्री.बी.बी.जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती जत श्रीमती अरुणा इटाई यांनी कार्यक्रमातील प्रपत्रासोबत सादर केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुंवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष सदाशिव रिसबूड
८२२ अ, भांडारकर पथ, गल्ली क्र.८, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त न्यायाधीश,
लघुवाद न्यायालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक, लघुवाद न्यायालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष सदाशिव रिसबूड
८२२ अ, भांडारकर पथ, गल्ली क्र.८, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक, लघुवाद न्यायालय, पुणे श्रीमती व्ही.सी.मिश्रा

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.१.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.३.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

बारा महिन्याच्या कालावधीतील खटल्यांबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, लघुवाद न्यायालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. परंतु त्यांनी 'सिव्हील मॅन्युअलमधील तरतुदीनुसार नकलेसाठी अर्ज करावा,' असे कळविले व काही मुद्दयांची माहिती जिल्हा न्यायालयाच्या कक्षेत असल्याचे कळवून नाकारली. सिव्हील मॅन्युअलमधील तरतुदीनुसार दाव्यातील संबंधित व्यक्ती, त्यांचे मान्यताप्राप्त प्रतिनिधी अथवा त्यांचे वकील यांनाच नकलांची मागणी करता येते. मात्र नकला मागण्यामागचा उद्देश नमूद करणारे प्रतिज्ञापत्र सादर करून अन्य व्यक्तीला अशी माहिती मागता येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, पुणे यांनी निकालपत्रात म्हटले आहे. परंतु माहिती मागणीचा उद्देश विचारता येणार नाही, अशी तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ६(२) मध्ये आहे. म्हणून या नकला आपल्याला मिळाल्या पाहिजेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.एस.एस.रिसबूड यांनी केले.

न्यायालयीन कामकाजाशी संबंधित विषय असल्यामुळे नकलाबाबतच्या तरतुदीनुसार आपण कार्यवाही केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, लघुवाद न्यायालय, पुणे श्रीमती व्ही.सी.मिश्रा यांनी केले.

अपीलकर्त्याने मागितलेली संख्यात्मक स्वरूपाची माहिती हा न्यायालयीन प्रक्रियेवर परिणाम करणारा भाग नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनिमय, २००५ मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाची हरकत नसल्यास आवश्यक प्रती अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्त्याने काही मुद्दयांमध्ये (मुद्दा क्र.२,५) स्पष्टीकरण वा अन्वयार्थ याची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनिमय, २००५ मधील तरतुदीनुसार ती 'माहिती' ठरत नाही. काही माहिती (उदा.मुद्दा क्र.७) उच्च न्यायालयाच्या कक्षेतील आहे. त्यातील संख्यात्मक स्वरूपाची माहिती व मुद्दा क्र.७ मधील प्रारंभिक भागाचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, लघुवाद न्यायालय,

पुणे यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसात द्यावे. आदेशाच्या कागदपत्रांच्या नकलाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने केलेल्या नियमानुसार अपीलकर्त्याने नकला प्राप्त करून घ्याव्यात, 'माहिती मागण्याचा उद्देश विचारता येणार नाही,' अशी स्पष्ट तरतूद संसदेने पारित केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये आहे. तथापि असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार मुद्दा क्र.२,५ व ७ चे उत्तर अपीलकर्त्यास दिल्याचे उत्तराच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, लघुवाद न्यायालय, पुणे श्रीमती व्ही.सी.मिश्रा यांनी दि.१२.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री प्रविण दादासाहेब इंदुलकर — अपीलकर्ता
१९४९, ई, राजारामपुरी, ११ वी गल्ली,
कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, करवीर, — उत्तरवादी
जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसिलदार, करवीर,
जि. कोल्हापूर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९९ + ८००/२००९/कोल्हापूर | | |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक | १०.२.२०१० | |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, करवीर, जि. कोल्हापूर श्री.बी.बी.वाघमोडे<br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसिलदार, करवीर, जि. कोल्हापूर श्री.एस.बी.ढोले | | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | १२.५.२००९ | ५.५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | | |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | २०.६.२००९ | २०.६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | १७.७.२००९ | १७.७.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | | | |

## <u>विवेचन</u>

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर, जि.कोल्हापूर यांनी उपलब्ध करून दिली असल्यामुळे कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.प्रविण दादासाहेब इंदुलकर यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संदिपान सावळाराम गायकवाड
७२५/१/२३ शिवाजीनगर,बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय बार्शी, जि. सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, शेंद्री,
ता. बार्शी जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४५+८४६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संदिपान सावळाराम गायकवाड
७२५/१/२३ शिवाजीनगर,बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय बार्शी,
ता.बार्शी, जि. सोलापूर प्रतिनिधी श्री.बी.एन.रंगदाळ

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, शेंद्री,
ता. बार्शी जि. सोलापूर विद्यमान-श्री.ए.जे.नाईक नवरे, तत्कालीन-श्री.टी.एल.सातपुते

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.११.२००९ रोजी घेण्यात आली.

जमिनीच्या नोंदीबाबत नमुना-ब च्या नोटिशीच्या सत्यप्रती जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, शेंद्रे, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी दिल्या नाहीत. १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी दिले. त्यानुसार माहिती मिळाली नाही. माहितीचा शोध घेऊन उपलब्ध असल्यास १५ दिवसात देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ठरले. परंतु माहिती मिळाली नाही. तत्कालीन तलाठ्याने बनावट कागदपत्रे तयार केली असल्यामुळे माहिती दिली जात नाही व खरेदीखताची नोंद दोन वर्षे करू नये असे सांगितले असतानाही नोंद केली आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.संदिपान सावळाराम गायकवाड यांनी केले.

सन २००२ मध्ये खरेदीखत झाले व २००४ साली नोंद केली. आपण श्री.एल.के.शिर्के यांना तलाठी दप्तराचा कार्यभार संपूर्ण कागदपत्रांसह दिला असल्यामुळे माहिती त्यांनी द्यावयास हवी होती, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, शेंद्रे, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.टी.एल.सातपुते यांनी केले. आपण सन २००९ मध्ये पदभार स्वीकारला

असून कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता आली नाही, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, शेंद्रे, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.ए.जे.नाईकनवरे यांनी केले.

संदर्भित नोटीसबुक हा कायमस्वरूपी अभिलेख आहे. श्री.सातपुते यांनी दिलेल्या कागदपत्रात अपीलकर्त्यास हवी असलेली नोटिशीची प्रत उपलब्ध नाही, असा जबाब श्री.एल.के.शिर्के यांनी दिला आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.बी.एन.रंगदाळ यांनी केले.

जमीन खरेदी देणाऱ्यास नोटीस न बजावता खोटी फेरफाराची नोंद मंजूर केली असल्याची श्री.गायकवाड यांची तक्रार आहे. ही माहिती देण्याबाबत तत्कालीन गावकामगार तलाठी, शेंद्री श्री.टी.एल.सातपुते यांना दि.२२.११.२००७ व १२.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. तथापि त्यांनी माहिती दिली नाही व श्री.एल.के.शिर्के यानी तलाठी दप्तराचा कार्यभार संपूर्ण कागदपत्रांसह दिला असल्याचे दि.१७.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. संबंधित नोटिशचा शोध घेऊन देण्याबाबत श्री.शिर्के यांना कळविले असता त्यांनी संदर्भित नोटीस दप्तरात आढळून येत नसल्याचे लेखी म्हणणे दिले. श्री.टी.एल.सातपुते यांनी सदरची कागदपत्रे फेरिस्त करून ठेवली नसल्यामुळे नोटीस उपलब्ध होत नसल्याचे दिसून आल्यामुळे श्री.सातपुते यांच्याविरुध्द आपल्या कार्यालयाकडून खातेनिहाय चौकशी सुरू करण्यात आली आहे, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्रीमती ज्योती हणमंत पाटील यांनी दि.१९.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले होते. मात्र पुढील कार्यवाहीचा अहवाल त्यांनी आयोगाला सादर केलेला नाही.

संबंधित अभिलेखाचा १५ दिवसांत शोध धेऊन अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या प्रती नि:शुल्क द्याव्यात. कायमस्वरूपी जतनाचे अभिलेख उपलब्ध न झाल्यास त्याला जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा व तहसीलदार, बार्शी यांनी श्री.टी.एल.सातपुते यांच्याविरूध्द सुरू केलेल्या खातेनिहाय चौकशीनंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी आयोगाला दि. ५.४.२०१० पर्यंत सादर करावा.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८.३.२०१०**